# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव

फोन ०२५७-२२२१७९० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र- १९७** **दिनांक :- २६/१०/२०२६**

## जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखनीय कामगिरी!
## " कासोदा पोलीस ठाण्यात दाखल Attempt to Murder (खुनाचा प्रयत्न) गुन्ह्यातील पाहिजे आरोपी जेरबंद "

**मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव** यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी यांना त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदारांची विशेष पथके तयार करून जिल्ह्यात दाखल गुन्ह्यांतील पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करण्यासाठी तसेच पाहिजे व फरार आरोपींची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने विशेष मोहीम प्रभावीपणे राबविण्याचे आदेश दिले होते.

त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राहुल गायकवाड यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील अधिकारी व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून त्यांना पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेण्याबाबत मार्गदर्शन व सूचना दिल्या होत्या.

सदर मोहिमेदरम्यान दिनांक २६/१०/२०२६ रोजी विशेष पथकातील अधिकारी व अंमलदार यांना विश्वसनीय बातमीदारामार्फत गोपनीय माहिती मिळाली की, **कासोदा पोलीस ठाणे गु.र.नं. १२१/२०२६, भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १०९ अन्वये दाखल Attempt to Murder (खुनाचा प्रयत्न) गुन्ह्यातील गुन्हा घडल्यापासून फरार असलेला पाहिजे आरोपी अरबाज शेख जुम्मा, वय २२ वर्षे, रा. कुऱ्हाड, ता. पाचोरा, जि. जळगाव हा त्याच्या मूळ गावी कुऱ्हाड येथे आहे.** प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे विशेष पथक तात्काळ कुऱ्हाड येथे रवाना झाले. पथकाने नमूद आरोपीचा शोध घेऊन त्यास शिताफीने ताब्यात घेतले व पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी कासोदा पोलीस ठाण्यात हजर केले आहे.

**सदरची कामगिरी मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, मा. श्री. अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक, चाळीसगाव, मा. श्री. विजयकुमार ठाकुरवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी, चाळीसगांव उपविभाग आणि श्री. राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांच्या यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक श्री. संतोष पवार, पोहेकॉ हरिलाल पाटील, पोहेकॉ विलेश सोनवणे, पोना/हेंमत पाटील, पोकॉ राहुल कोळी, पोकॉ गोपाळ पाटील व चापोकॉ रिझवान शेख यांच्या पथकाने केली आहे.**

***" जळगाव जिल्हा पोलीस दलाकडून पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध प्रभावी कारवाई करण्याची विशेष मोहीम सातत्याने राबविण्यात येत आहे "***

**********************************************************************